बुधवार दि.१२ मार्च २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१७८ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# मराठवाड्यामध्ये तुकाराम मुंडे यांना विभागीय आयुक्त म्हणून पाठवा

## सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांची मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

मराठवाड्यामध्ये गुंडगिरी कमी करण्यासाठी स्ट्राँग व्यक्ती देण्याची गरज आहे. त्यामुळे मराठवाड्यामध्ये तुकाराम मुंडे यांना विभागीय आयुक्त म्हणून शासनाने पाठवावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केली आहे. त्यांच्यासारख्या स्ट्राँग ऑफिसर आणि स्ट्राँग व्यक्तिमत्त्वाची महाराष्ट्राला गरज असल्याचे दमानिया यांनी म्हटले आहे. या मागणीवर राज्य सरकार काय निर्णय घेते? या बाबत आता चर्चा सुरू झाली आहे.बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच देशमुख यांची हत्या झाल्यानंतर मराठवाड्यातील सामाजिक आणि राजकीय समीकरणे बदलली आहेत. मराठवाड्यामध्ये विशेषतः बीड जिल्ह्यामध्ये असलेल्या अधिकाऱ्यांच्या अनेक वर्षांपासून बदल्या झालेल्या नसल्याची बाब समोर आली आहे. पोलिस विभागात तर अनेक अधिकारी एकाच जागेवर कित्येक वर्षांपासून काम करत असल्याचा आरोप केला जात आहे. या सर्व प्रकरणात आता मराठवाड्यामध्ये मुंडे विरुद्ध मुंडे अशा अधिकाऱ्यांचे नाव दमानिया यांनी सुचवले आहे.

सतीश भोसले प्रकरणांमध्ये ते अद्याप पोलिसांना सापडला नसला तरी देखील त्याने माध्यमांना मुलाखत दिली आहे. यावरून देखील अंजली दमानिया यांनी पोलिसांवर टीका केली आहे. पोलिस अधीक्षकांनी चॅनल वर कारवाई करण्यापेक्षा पोलिसांवर कारवाई करावी, असा टोला त्यांनी लगावला. सतीश भोसले प्रकरणात तो अद्यापही फरार असला तरी देखील त्याने वृत्तवाहिनीला मुलाखत दिली आहे. त्यावरून आता राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.



### प्रत्येकाच्या आपापल्या टोळ्या आणि राजकीय वरदहस्त

**या संदर्भात बोलताना अंजली दमानिया यांनी सांगितले की, माझ्याकडे अनेक प्रकरणावर पुरावे येत आहेत. रोज मेसेज येत आहेत, रोज व्हिडिओ येत आहेत. हे सर्व पाहून मला रात्रीची झोप येत नाही. धनंजय मुंडे आणि त्यांच्या विरोधातील कृषी घोटाळ्याची मोठी मालिका उपलब्ध झाली आहे. त्यात त्यांनी ऑफिस ऑफ प्रॉफिट काढले होते. बीड मधील राजकीय दहशतवादावर देखील त्यांनी यावेळी भाष्य केले. प्रत्येकाचे आपापले कार्यकर्ते आहेत, प्रत्येकाच्या आपापल्या टोळ्या आहेत. या सर्वांना राजकीय वरदहस्त असल्याचा आरोप त्यांनी केला. मात्र यावर प्रशासकीय यंत्रणेत कडक ऑफिसर आणायला हवेत, अशी मागणी दमानिया यांनी केली आहे.**


# विजेच्या धक्क्याने शाळकरी मुलाचा मृत्यू

## निलंगा तालुक्यातील गुंजरगा जिल्हा परिषद शाळेतील घटना

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**निलंगा | इस्माईल महेबूब शेख**

शाळेच्या आवारात स्नेहसंमेलनाची तयारी करीत असताना भिंतीच्या कडेला असलेल्या उघड्या लोखंडी खांबाला स्पर्श होताच विद्यार्थ्याला जोरात विद्युत धक्का बसला. त्यातच त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना निलंगा तालुक्यातील मौजे गुंजरगा येथे दि.१० मार्च रोजी सोमवारी सायंकाळी ०६ वजेच्या सुमारास स्नेहसंमेलनाची तयारी चालू असताना घडली.कृष्णा दत्ता शिंदे वय १२ वर्षे रा.गुंजरगा ता.निलंगा जिल्हा लातूर असे मृत विद्यार्थ्याचे नाव आहे. येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत इयत्ता सातवीचा तो विद्यार्थी होता. या शाळेत आज स्नेहसंमेलन असल्याने शाळेतील शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सायंकाळी ०४ वाजेच्या सुमारास बोलावले होते.



कृष्णा शिंदे हा ही शाळेत आला शाळेच्या आवारात स्नेहसंमेलनासाठी उभ्या केलेल्या लोखंडी खांबाला स्पर्श झाल्याने त्यात वीजप्रवाह प्रवाहित असल्याने त्याला जोरात विजेचा धक्का लागला. ही बाब लक्षात येताच इतर विद्यार्थ्यांनी आरडाओरड केली. तेथील शिक्षकांनी निलंगा येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. तिथे डॉक्टरांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केले.मयत कृष्णा शिंदे यांच्या घरची आर्थिक परिस्थिती हालाखीची असल्याने त्याचे आईवडील शेतीची कामे करून उदरनिर्वाह करतात. शिवाय, मयत कृष्णा याची निलंगा येथील शाळेत शिकण्याची इच्छा होती. मात्र, आर्थिक परिस्थितीमुळे त्याला गावातील शाळेत शिकविण्याचा निर्णय घेतला, अशी माहिती त्याच्या पालकांनी दिली.या शाळेत मुख्याध्यापक म्हणून पणबोने यांच्यासह अनेक शिक्षकांची नियुक्ती केली आहे. मात्र हे शिक्षक मुख्यालयी राहात नसून, ते रोज निलंगा येथून ये – जा करतात. शाळेत घडलेली घटना ही अत्यंत दुर्दैवी असून घटना ऐकून धक्काच बसला असून सदर प्रकरणी दोषीवर कायेशिर कारवाई करण्याची मागणी जागृत नागरिकांत जोर धरत आहे.

# हडसनी नवीन शाळेत जागतिक महिला दिन साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**माहूर | राजकिरण देशमुख**

माहूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हडसनी (नवीन) येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी राजमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले माता रमाई यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यावेळी अँड. वैष्णवी कोथळकर यांनी महिला दिनानिमित्त कायदेविषयक मार्गदर्शन केले.यावेळी ग्रामसेविका मोरे ,सरपंच शिंदे आरोग्य सेविका खिलारे,मेकेवाड,अंगणवाडी सेविका उज्वला चव्हाण यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला .यावेळी निशा बनकर यांनी




कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन केले.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेचे मुख्याध्यापक एम.डी.वर्धे, शिक्षक नामपल्ले,वडजे,कदम यांनी परिश्रम घेतले.




# शिक्षिका स्नेहल सरकटे यांचा लोकमत सखी मंच तर्फे महिला दिनानिमित्त विशेष सन्मान !

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बुलढाणा | प्रतिनिधी**

मोताळा येथे जिल्हा परिषद शाळा क्रमांक १ येथे आदर्श शिक्षका म्हणून कार्यरत असलेल्या स्नेहल सिद्धार्थ सरकटे यांचा त्यांच्या कार्याबद्दल लोकमत सखी मंचाच्या वतीने महिला दिनानिमित्त विशेष सन्मान करण्यात आला आहे '



स्नेहल सरकटे या सातत्याने जिल्हा परिषद शाळा येथे विद्यार्थ्यांना शिकवताना विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत असतात ' त्यामध्ये विद्यार्थ्यांचा वाढदिवस साजरा करणे ' विविध महापुरुषांच्या जयंती पुण्यतिथी साजरी करणे ' विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व कळावे व विद्यार्थ्यांना शिक्षणाचे आकर्षण व्हावे याकरता गाण्याच्या माध्यमातून शिकवणे ,असे विविध उपक्रम त्या राबवत असतात ' याच कार्यामुळे त्यांना ३० डिसेंबर रोजी साखरखेर्डा येथे दिग्गज मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले नारीशक्ती आदर्श शिक्षिका हा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले होते ' त्यानंतर अतिशय प्रेरणादायी मुलाखत बुलढाणा चौफेर न्युजच्या वतीने घेण्यात आली होती त्यामध्ये सुद्धा सरकटे मॅडम यांनी अतिशय सुंदर मुलाखत दिली होती आणि याच कार्याची दखल घेत त्यांचा सन्मान लोकमत सखी मंचातर्फे करण्यात आला , त्यांना सन्मानपत्र देताना सन्मानपत्र वर त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून स्वप्नांना पंख मिळू दे ,पाऊल सतत पुढेच पडू दे , अशी शब्द आहेत हे शब्द प्रेरणादायी असून लोकमतच्या वरिष्ठ व प्रतिष्ठित मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये त्यांचा हा सन्मान करण्यात आला, नक्कीच त्यांच्या कार्याला बळ मिळेल हा सन्मान तर सर्व महिलांसाठी प्रेरणादायी आहे की त्या समाजात चांगले काम करतात .त्यांना मिळालेल्या सन्मानामुळे त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे .



दिल्ली येथे केंद्रीय परिवहन मंत्री मा.ना.श्री नितीनजी गडकरी यांची आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी भेट घेऊन कंधार लोहा तालुक्यातील रस्ते विकासाच्या संदर्भात त्यांच्या सोबत चर्चा केली व त्या अनुषंगाने निवेदनही दिले. यावेळी सकारात्मक चर्चा होऊन निधी देण्या बाबतचे त्यांनी आश्वासन दिले.(लोकनेता न्युज नेटवर्क)




पोलीस स्टेशन सोनखेड येथे पि एसआय माने साहेब यांनी जागतिक महिला दिनानिमित्त महिला पोलिसांचा सत्कार करून सन्मानित केले.(छाया–गोविंद मोरे)

# गुरुजी फाऊंडेशनचा दूरदर्शी उपक्रम तळेगाव व चिंचाळा येथील बंधारे पावसाळ्यापूर्वी तयार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पाटील**

गुरुजी फाऊंडेशनच्या वतीने तळेगाव व चिंचाळा येथील शेतकऱ्यांसाठी एक महत्त्वपूर्ण आणि दूरदर्शी उपक्रम राबवला आहे. दिनांक १५ जानेवारी २०२५ रोजी व्ही.पी.के. ग्रुपचे संस्थापक आणि चेअरमन माननीय श्री मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांच्या हस्ते तळेगाव व चिंचाळा येथील सहावा बंधारा बांधण्याचे भूमिपूजन करण्यात आले होते. आज, ६ मार्च २०२५ रोजी, बंधारा पाणी साठवण्यासाठी पूर्णतः भरला असून परिसरातील शेतकऱ्यांसाठी तो एक मोठे वरदान ठरला आहे.

बंधारे पाणी साठवण्याचा एक महत्त्वपूर्ण साधन असतात. शेतकऱ्यांसाठी पाणी हे उत्पादनाचे मुख्य स्रोत आहे. पाण्याच्या कमतरतेमुळे शेतकऱ्यांना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो, विशेषत: उन्हाळ्याच्या दिवसात. पाण्याचा पुरेसा स्रोत न मिळाल्यामुळे पीक उत्पादनात घट येते आणि शेतकऱ्यांना आर्थिक अडचणी येतात. याच पार्श्वभूमीवर गुरुजी फाऊंडेशनने बंधाऱ्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी पाणी साठवणुकीच्या उपायांचा शोध घेतला आहे.


बंधारा प्रकल्पाचे महत्त्व आणि याचे सामाजिक परिणाम दर्शविणारी शेतकऱ्यांसाठी पाणी साठवणूक, पिकांच्या वाढीला मदत, गुरांसाठी पाण्याची उपलब्धता, आणि पर्यावरणीय दृष्टिकोन यावर गुरुजी फाऊंडेशन ने जोर दिला आहे. गुरुजी फाऊंडेशन ने ग्रामीण भागातील लोकांना पाणी साठवणुकीचे महत्त्व, बंधाऱ्याचे फायदे, आणि कशाप्रकारे शेतकऱ्यांच्या जीवनात सुधारणा होऊ शकते, हे समजावून सांगण्यात आले. यामुळे लोकांची जागरूकता वाढली आणि



ते प्रकल्पाच्या लाभांबद्दल अधिक उत्साही झाले. शेतकऱ्यांच्या दृषटिकोनातून हा बंधारा पाणी साठवण्याचा एक अत्यंत फायदेशीर प्रकल्प आहे. पाण्याचा पुरेसा साठा होण्यामुळे शेतकऱ्यांना आपली पिके योग्य वेळी पाणी देणे शक्य होईल, ज्यामुळे पिकांचे उत्पादन वाढेल. त्याचबरोबर, पाणी न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांना होणारा तणाव कमी होईल. शेतकऱ्यांना उन्हाळ्यात पाण्याची समस्या कायम असते. या बंधाऱ्यामुळे पाण्याचा साठा होऊन त्याचा वापर उस, गहू, हरभरा आणि भुईमूग पिकांसाठी केला जाऊशकतो. या बंधाऱ्यामुळे परिसरातील विहिरींना आणि बोरवेलच्या पाण्यात चांगली वाढ होईल. तसेच, गुरांसाठी पाणी उपलब्ध होईल, ज्यामुळे त्यांना वणवण करण्याची गरज नाही. पाणी साठवले जात असल्याने, भूजल पातळी वाढेल आणि त्या भागातील पर्यावरण सुधारले जाईल, गुरुजी फाऊंडेशनचा मुख्य उद्देश या परिसरात इतर ठिकाणीही अशाच प्रकारचे बंधारे तयार करणे आहे. बंधाऱ्यामुळे शेतकऱ्यांचे जीवन अधिक सुलभ होईल आणि त्यांना उन्हाळ्यात पाणी मिळण्याच्या अडचणींवर मात करता येईल. भविष्यात, उमरी तालुक्यात अशा प्रकारच्या आणखी दहा बंधाऱ्यांचे बांधकाम निर्मिती करण्याची योजना आहे. या प्रकल्पामुळे शेतकऱ्यांमध्ये एक नवीन आशा निर्माण झाली आहे. बंधारा पूर्ण झाल्यामुळे त्यांना पाण्याचा साठा होईल आणि त्याचा वापर त्यांच्या शेतातील उत्पादनासाठी होईल. शेतकऱ्यांनी गुरुजी फाऊंडेशनचे आणि कवळे गुरुजीचे मनापासून आभार व्यक्त केले. गुरुजी फाऊंडेशनच्या या उपक्रमामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे

# आई म्हणजे काय

लोकनेता न्यूज नेटवर्क



आई म्हणजे ममता तसेच आई म्हणजे आत्मा आणि आई म्हणजे ईश्वर या दोघांचा संगम म्हणजे आई होय. मायेची पाखरण करणारी एक स्त्री होय. एखादी स्त्री जेव्हा अपत्यास जन्म देते त्यावेळेस तिला मातृत्व प्राप्त होते. आणि समाजाच्या दृष्टीने ती त्या अपत्याची आई बनते. आईचे खरे प्रेम आणि पालनपोषण या सोबत कशाचीही तुलना केली जाऊ शकत नाही. आमच्या आयुष्यातील ती एकमेव महिला आहे जी कोणत्याही हेतूशिवाय आपल्या मुलांवर भरपूर प्रेम करते. मूल म्हणजे आईसाठी सर्वस्व असते

ती एक चांगली श्रोता आहे आणि आम्ही सांगत असलेल्या आमच्या चांगल्या आणि वाईट गोष्टी ऐकत असते . ती आम्हाला कधीही रोखत नाही आणि कोणत्याही प्रकारे आम्हाला बांधत नाही. ती आम्हाला चांगल्या आणि वाईट मधील फरक शिकवते. आई आम्हाला प्रत्येक आनंदात आणि दुःखात मदत करते, जेव्हा आपण आजारी असतो, तेव्हा ती आपल्यासाठी रात्रभर जागी राहते आणि आपल्या चांगल्या आरोग्यासाठी देवाची प्रार्थना करते.शब्द मानवी भावनांशी निगडित असून त्यास माणसाच्या जीवनात अनन्यसाधारण महत्व प्राप्त झालेले आहे. स्त्रीने जन्म दिला नसतानाही ती सवतीच्या मुलाची किंवा दत्तक मुलाची आई बनते.आई ही शांतादुर्गाचे रूप आहे, मराठी भाषेतला आई हा आई मायेचा सागर आहे. या विषयावर अनेकांनी काव्य आणि निबंध लिहिले आहेत. रामायणातील महानायक श्रीरामचंद्रानीही, स्वर्णमयी लंकेपेक्षाच काय, पण स्वर्गापेक्षाही आपली जन्मभूमी अयोध्या श्रेष्ठ आहे असे म्हणले आहे. हे सांगताना त्यांनी जन्मभूमीची आईशी बरोबरी केली आहे. ते म्हणतात, जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी. मराठीतील प्रसिद्ध कवी यशवंत यानी आपल्या कवितेत स्वामी तिन्ही जगाचा, आईविना भिकारी ही ओळ लिहून आई या शब्दाची महानताच थोडक्यात सांगतात.

### गोंडपिपरीत पार पडला उदघाटन सोहळा

# सक्षम महिला उदयोजक घडविण्यासाठी यत्नांची पराकाष्ठा करणार-पवन वानखेडे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**गोंडपिपरी । आशिष आ.निमगडे**

सकारात्मक दुष्टीकोन नेहमीच उर्जा देतो.यामाध्यमातून नवीन चेतना मिळते.विकासाची दृष्टीही निर्माण होते.हेच उधिष्ट ठेउन आपण सुरू केलेल्या उपक्रमाला ७२ हजार महिला जुळल्या.त्यांचा सर्वांगिण विकास करणे,यातून सक्षम महिला उदयोजक निर्माण करण्यासाठी आपण प्रयत्नांची पराकाष्ठा केली असून आजघडीला त्याला मोठे यश मिळाले आहे.येत्या दिवसात गावगावातील महिलांचा सर्वानींग विकासाच्या दृष्टीने आपली वाटचाल सुरु असल्याचे प्रतिपादन गाव माझा फांउडेशनचे संस्थापक अध्यक्ष पवन वानखेडे यांनी केले.चंद्रपूर जिल्हयातील गोंडपिपरी येथे गांव माझा फांउडेशन च्या माध्यमातून उपक्रमाचे उदघाटन करण्यात आले यावेळी ते



मार्गदर्शन करतांना बोलत होते. गोंडपिपरीचे ठाणेदार रमेश हत्तीगोटे, बाजार समितीचे संचालक महेंद्रसिहं चंदेल,अष्टगाथा वानखेडे, फाउंडेशनचे रिजनल मॅनेजर राजकपूर भडके,पत्रकार संदीप रायपूरे,बाळू निमगडे,राजू झाडे,आशिष निमगडे,प्रसेनजीत डोंगरे,अरुण वासलवार,कांता भडके यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. गाव माझा फाउंडेशनच्या माध्यमातून महिला संघटन व सक्षमीकरणासाठी गेल्या अनेक वर्षापासून विविध उपक्रम राबविल्या जात आहेत.आजघडीला या संघटनेसोबत ७०हजार महिला जुळल्या आहेत.या संपूर्ण महिलांचा आर्थीक विकास करण्यासोबत त्यांना यशष्वी उदयोजक बनविण्यासाठी फाउंडेशन काम करित आहे.याचाच एक भाग म्हणून चंद्रपूरातील गोंडपिपरी येथे नुकताच एक उपक्रम संपन्न झाला.यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून महिला सक्षमीकरणा बाबत भूमिका मांडली. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष पवन वानखेडे यांनी महिलाना प्रोत्हाहित करणारे मार्गदर्शन केले.याप्रसंगी उत्कृष्ट कामगिरी केल्याबाबत फांउडेशनचे राजकपूर भडके यांना रिजनल मॅनेजरपदी बढती देत त्यांचा सन्मान करण्यात आला.यावेळी महेद्रसिंह चंदेल यांनी फांउडेशनच्या वतीने घेण्यात येत असलेल्या उपक्रमांचे कौतूक केले.यावेळी विविध मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.फाउंडेशन च्या माध्यमातून गावगावातील महिला शक्तीला एकत्र आणीत त्यांना रोजगाराची संधी देण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.याप्रंसगी दर्शना दुर्गे,पायल देवतळे,प्रतिक्षा रायपूरे, अनिता निमसरकार,अमावशा निमसरकार,आश्लेषा चिडे,शारदा शिंदे, अनिता वाघमारे,कुंद्रा कोनेकर, यांच्यासह अनेक महिलांनी कार्यक्रमा साठी परिश्रम घेतले.या उपक्रमाचे प्रास्ताविक राजकपुर भडके यांनी तर संचालन अमावशा निमसरकार यांनी केले.

# गुरुजी फाउंडेशनच्या वतीने तळेगाव व कारेगाव येथे वनराई बंधाऱ्याचे जलपूजन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पाटील**

पाणी आडवा पाणी जिरवा या संकल्पनेतुन उमरी व धर्माबाद तालुक्यातील पाण्याची पातळी वाढली पाहिजे या भागातील शेतकरी हा आर्थिक द्रष्ट्या संपन्न झाला पाहिजे या उद्देशातून मा.श्री मारोतराव पाटील कवळे गुरुजी संस्थापक अध्यक्ष व्हीपीके उद्योग समूह यांच्या संकल्पनेतून स्थापन झालेल्या गुरुजी फाउंडेशन कुसुमनगर वाघलवाडा यांच्या वतीने वनराई बंधारे बांधलेल्या तळेगाव व कारेगाव येथील वनराई बंधाऱ्याच्या पाण्याचे जल पूजन युवा नेते,संदीप पाटील कवळे (अध्यक्ष) गुरुजी फाउंडेशन, व संचालिका सौ पूजाताई कवळे/जाधव पाटील यांच्या हस्ते आज जलपूजन संपन्न झाले.

सदरील कार्यक्रमास तळेगाव नगरीचे



उपसरपंच श्री रुकमान बेग मोगल, गोविंद तळेगाव,गावातील श्री मोगल साहेब व इतर गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते, तसेच कारेगाव/हरेगाव येथे जलपूजनास उमरी मार्केट कमिटी संचालक बापुराव पाटील करकाळेकर, माजी संचालक दत्ताहरी पाटील हिवराळे, करेगावचे जेष्ठ मारोतराव पाटील शिंदे, देवराव पाटील,संचालक लक्ष्मणराव पाटील हरेगावकर,तानाजी पाटील शिंदे, नागोराव पाटील हिवराळे, संचालक उत्तमराव होनशेट्टे, कोषध्याक्स अनिल पाटील वडजे, सचिव सुनील जोगदंड, संचालक बाबुराव भोसले, सटवा पवार नायगावचे भगवान पाटील चव्हाण गुरुजी फाउंडेशनचे सर्व संचालक मंडळ उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री बाबुराव भोसले (समन्वयक गुरुजी फाउंडेशन) व आभार प्रदर्शन श्री यु. जी. कदम कार्यवाह गुरुजी फाउंडेशन यांनी मांडले.

# पारध बू.येथे भव्य पशूसंवर्धन शिबीर संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । राम शिंदे**

भोकरदन तालुक्यातील पारध बू.येथील सामाजिक कार्यकर्ते स्व. प्रतापराजे देशमुख यांच्या १० व्यां पुण्यतिथी निमित्त सोमवारी पारध येथे भव्य पशुसंवर्धन शिबिर पार पडले .यावेळी भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र देशमुख. माजी पं.स. सभापती परमेश्वर लोखंडे , शिवसेना शिंदे गटाचे तालुकाप्रमुख विशाल गाढे, पत्रकार विशाल अस्वर,माजी चेअरमन संजय कतोरे ,किरण श्रीवास्तव ,सखाराम लोखंडे ,राजू अण्णा पाखरे ,प्रा.साहेबराव लोखंडे ,भा.ज.पा.चे ज्येष्ठ नेते दिलीप बेराड ,राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक समाधान लोखंडे,दिलीप देशमुख यांच्यासह ग्रामस्थ व पशुपालक शेतकऱ्यांनी मोठी गर्दी केली होती . शिबिराला प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉक्टर यू. बी. वानखडे आणि डॉ. राजरत्न वाघमारे यांनी मार्गदर्शन केले सोबतच




पशुतज्ञ म्हणून डॉ. राजेश फुके ,डॉ. राजेश पवार, डॉ. पंडित जराड, डॉ. श्रीकृष्ण भगत, डॉ. अमोल लोखंडे, उमेश ताजी आदींनी शिबिराला अनमोल सहकार्य केले. शिबिर यशस्वी पार पाडण्यासाठी राजू अण्णा पाखरे, विशाल लोखंडे ,प्रफुल लोखंडे, शिवा लोखंडे, योगेश देशमुख ,भारत लोखंडे मंगेश देशमुख, संदीप लोखंडे, पांडू लोखंडे चेतन देशमुख,आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष पाखरे यांनी केले , प्रस्ताविक संग्रामराजे देशमुख यांनी केले तर आभार विशाल आस्वार यांनी मानले. या शिबिराचे आयोजन सामाजिक कार्यकर्ते सागर देशमुख यांनी केले होते.

# पालकमंत्री अजित पवार यांनी ८२ आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना निधी द्यावा या मागणीसाठी लक्ष्यवेधी विकासाचे गाजर वाटप आंदोलन-डॉ.गणेश ढवळे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार राज्याचा वर्ष २०२५-२६ चा अर्थसंकल्प सादर करणार असून बीड जिल्ह्यातील ८२ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीय शासकीय मदतीपासून वंचित असुन त्यासाठी आवश्यक १ कोटी ३२ लाख रूपयांच्या निधीची मागणी जिल्हा प्रशासनाने शासनाला दोन महिन्यांपासून केलेली असुनही अद्याप निधी मिळाला नाही. बीड जिल्ह्यातील जलजीवन मिशनच्या कामांसाठी निधीचा तुटवडा निर्माण झाला असुन २५० कोटी रुपयांचा निधी शासनाने द्यावा अशी जिल्हा प्रशासनाकडुन शासनाला मागणी करण्यात येऊन केवळ १४ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला असुन तातडीने उर्वरित निधी देण्यात यावा या प्रमुख मागण्यांकडे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांचे लक्ष्य वेधण्यासाठी आज दि.१० सोमवार रोजी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली अजितदादांच्या विकासाचे गाजर वाटप लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येऊन जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत अजितदादा पवार यांना निवेदन देण्यात आले.यावेळी आंदोलनात रामनाथ खोड,शेख युनुस, सुदाम तांदळे, शिवशर्मा शेलार ,,शेख मुबीन,शेख मुस्ताक, पांडुरंग हराळे, बीड जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी अशोक येडे, बीड जिल्हा सचिव इंटक सखाराम बेंगडे आदी सहभागी होते.बीड जिल्ह्यात १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत २०५ शेतकऱ्यांनी



आत्महत्या केल्याची शासन दरबारी नोंद आहे.यापैकी १०८ कुटुंबियांना मदत देण्यात आली असुन ६३ जणांना मिळणे बाकी आहे. मागच्या वर्षातील ६३ आणि चालु वर्षातील १७ अशी एकुण ८२ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीय शासकीय मदतीपासून वंचित आहेत. महाराष्ट्र राज्याच्या तिजोरीची चावी हाती असणारे राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री अजितदादा पवार हे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री असुनही आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीय शासकीय मदतीपासून वंचित असणे हि अशोभनीय बाब आहे . यासाठी आवश्यक १ कोटी ३२ लाख रुपयांच्या निधीची मागणी जिल्हा प्रशासनाने करून दीड महिना उलटुनही अद्याप निधी मिळाला नाही.बीडच्या विकासाचे व्हिजन दाखवणा-या अजितदादांनी विकासाचे गाजर बीडकरांच्या हाती दिल्याची जनमाणसात भावना असुन तातडीने मदतनिधी द्यावा. केंद्र सरकारने हर घर जल देण्यासाठी जलजीवन मिशन योजनेअंतर्गत प्रतिव्यक्ती ५५ लिटर पाणी देण्याची योजना कार्यरत केली असुन बीड जिल्ह्यात १२२३ गाव आणि वाड्यांची संख्या आहे. पाणीपुरवठा योजना राबविण्यासाठी ११८४ जुन्या आणि आता नव्याने ८१ अशी एकूण १२६५ पाणीपुरवठा कामांना मंजुरी देण्यात आलेली आहे. यात ० ते २५ टक्के कामे झालेली ८६ तर २५ ते ५० टक्के कामे झालेली १८० तर ५० ते ७५ टक्के कामी झालेली ३८७ कामे तर ७५ ते ९९ टक्के कामे पूर्ण झालेली ३२७ कामे आहेत. यात २४६ कामे पुर्णत्वाकडे असून ३३ योजना ग्रामपंचायतीकडे वर्ग केलेल्या आहेत. मागील ८ महिन्यापासून जलजीवन मिशन साठी निधीचा तुटवडा निर्माण झाला आहे. जिल्हा प्रशासनाने २५० कोटी रुपये निधीची मागणी शासनाकडे केलेली आहे. मात्र केवळ १४ कोटी रुपये निधी शासनाने उपलब्ध करून दिलेला आहे. त्यामुळे पालकमंत्री बीड य अजित दादा पवार यांनी तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा.अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

# रासेयोमुळे हृदयात सेवाभाव निर्माण होतो-प्रवीण गीते

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

महाविद्यालयात प्रवेश झाल्या नंतर राष्ट्रीय सेवा योजना मध्ये सहभाग नोंदविला, या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरात सहभागी होता आलं या शिबिराच्या माध्यमातून जिल्हा स्तरावरील व विद्यापीठ स्तरावरील अनेक शिबिरात सहभागी होण्याचं भाग्य मला लाभलं आणि याच शिबिराच्या माध्यमातून माझ्या हृदयात सेवेचा विचार रुजला. या विचारामुळे माझ्या आयुष्यात अमुलाग्र बदल झाला. सामाजिक परिवर्तनाच्या मार्गावर चालण्याची दिशा मला राष्ट्रीय सेवा योजनेच्या मुळे सापडली. राष्ट्रीय सेवा योजना आणि शिबिर हे सजग मेंदूंचा कार्यकर्ता निर्माण करण्याची कार्यशाळा आहे असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही असे उद्गार या प्रसंगी प्रवीण गीते यांनी काढले.दि. १० मार्च २०२५ – राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विशेष संस्कार शिबिरांतर्गत जिजामाता नगर सिंदखेडराजा येथे बौद्धिक सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात महिलांचे आरोग्य आणि तरुणांच्या उच्च शिक्षणातील उपस्थिती कमी होण्याची कारणे व उपाययोजना या महत्त्वाच्या विषयांवर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून प्रवीण गीते विश्वस्थ लोकजागर परिवार डॉ. पल्लवी रामदास निमावत, संस्थेच्या उपाध्यक्ष मा. रूपालीताई मुंडे, कैलास वसंतराव वायकोस (मुख्याध्यापक, न. प. प्राथ. शाळा, जिजामाता नगर) यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किशोर वळसे यांनी भूषवले.कार्यक्रमाची सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत गाडगेबाबा आणि भगवान बाबा यांच्या प्रतिमांचे पूजन, दीपप्रज्वलन व पुष्पार्पणाने झाली. यानंतर उपस्थित मान्यवरांचा पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.प्रमुख मार्गदर्शक प्रवीण गीते यांनी तरुण आणि उच्च शिक्षण: उपस्थिती कमी होण्याची कारणे व उपाययोजना या विषयावर विचारमंथन केले. त्यांनी सांगितले की, शिक्षण हे केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न राहता त्याचा उपयोग समाजकार्यासाठी व्हायला हवा. विद्यार्थी केवळ नोकरीच्या मागे न लागता सामाजिक परिवर्तनाचे वाहक बनले पाहिजेत.ते पुढे म्हणाले, महापुरुषांचे विचार कृतीत आणले तरच खऱ्या समाजसेवेचा अनुभव घेता येईल. शिक्षणव्यवस्थेतील त्रुटी ओळखून त्या दूर करण्यासाठी आपणच पुढाकार घेतला पाहिजे. समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी प्रत्येकाने आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजसेवेसाठी केला पाहिजे. त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या भूमिकेवर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांनी केवळ शिक्षण घेण्यावरच भर न देता समाजसेवेतून आत्मविकास घडवावा,असा संदेश दिला.या वेळी डॉ. पल्लवी निमावत यांनी महिलांच्या आरोग्याबाबत सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी पीसीओएस, थायरॉईड, कॅन्सर यांसारख्या महिलांमध्ये आढळणाऱ्या आजारांबाबत जागरूकता निर्माण केली. तसेच योग्य आहार, योग, मेडिटेशन व आरोग्यविषयक सवयींवर विशेष भर देण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. किशोर वळसे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात शिक्षण व आरोग्य हे समाज उभारणीचे महत्त्वाचे घटक असल्याचे सांगत या विषयांवर गांभीर्याने विचार करण्याची गरज असल्याचे स्पष्ट केले.कार्यक्रमाचे प्रस्ताविक महिला कार्यक्रमाधिकारी डॉ. संगीता वळसे यांनी केले. सूत्रसंचालन रासेयो कार्यक्रमाधिकारी सत्यनारायण नागरे यांनी, तर आभार प्रदर्शन कुमारी निकिता मांटे या स्वयंसेविकेने मानले.या कार्यक्रमाला परिसरातील नागरिक, विद्यार्थी आणि शिक्षक यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# साहित्यिक अनंत कराड राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्काराने सन्मानित

लोकनेता न्यूज नेटवर्क

**शिरूर कासार । ज्ञानेश्वर बुधवत**

स्व.पै.किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था निमगाव वाघा ता.जि.अहिल्यानगर या संस्थेचा सन २०२५ या वर्षाचा राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार शिरूर कासार जि.बीड येथील जेष्ठ साहित्यिक, एकता फाउंडेशन महाराष्ट्र राज्य चे संस्थापक अध्यक्ष तथा म.सा.प.संभाजीनगर केंद्रीय कार्यकारिणी सदस्य मा.अनंत कराड यांना नुकताच मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.



गेल्या काही वर्षांपासून संस्थेमार्फत राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा आणि राज्यस्तरीय काव्य संमेलन घेतले जात असून राज्यभरातील गुणवंत कवी, कवयित्रींसोबतच साहित्यिक, विचारवंत यांना निमंत्रित करून त्यांना सन्मानित करण्यात येते अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष पै.नाना डोंगरे यांनी दिली. साहित्यिक अनंत कराड हे गेल्या तीन दशकांपासून शैक्षणिक क्षेत्रात सेवा देत असून दरम्यानच्या काळात त्यांची एकूण चार पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. बीड जिल्हा परिषदेच्या जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कारासह अनेक उल्लेखनीय राज्यस्तरीय पुरस्कारांचे ते मानकरी आहेत. त्याचबरोबर सांस्कृतिक, सामाजिक, साहित्यिक आणि पर्यावरण क्षेत्रातही ते नेहमीच अग्रेसर असतात. समविचारी मंडळींना एकत्र करून त्यांनी एकता फाउंडेशन नावाची संस्था स्थापन केलेली असून या संस्थेने आजपर्यंत रक्तदान शिबीरे, वृक्षरोपण, शैक्षणिक साहित्य वाटप, अन्न धान्य वाटप, साहित्य संमेलने, राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा, राज्यस्तरीय निबंध स्पर्धा, राज्यस्तरीय शिव-चित्र स्पर्धा, राज्यस्तरीय भिम-चरीत्र स्पर्धा, दिवाळी फराळ वाटप, सितार-पखावज जुगलबंदी, बालकुमार संस्कार शिबीरे, ग्रंथालयाचे लोकार्पण, विभागीय काव्य संमेलन, राज्यस्तरीय ऑनलाईन काव्य संमेलने, कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीर असे अनेक उल्लेखनीय कार्यक्रम आयोजित केलेले आहेत.

साहित्यिक अनंत कराड यांना हा राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल एकता फाउंडेशन च्या राज्यभरातील सर्व पदाधिकाऱ्यांसह मराठवाडा साहित्य परिषद, विविध शिक्षक संघटना आणि तालुक्यातील दोनही पत्रकार संघाचे पदाधिकारी व सभासद आणि सामाजिक संघटनांच्या कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# प्राचार्य राजेंद्र केशवे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**माहूर । राजकिरण देशमूख**

माहूरचे माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक कापूस पणन महासंघ संचालक महाराष्ट्र राज्य, नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक प्राचार्य राजेंद्र केशवे यांचा वाढदिवस आज त्यांच्या माहूरगड संपर्क कार्यालयात साध्या पद्धतीने साजरा करण्यात आला. संपन्न झालेल्या वाढदिवस कार्यक्रमाला तालुका व शहरातील विविध राजकीय पक्ष व सामाजिक संघटनाचे प्रतिनिधी तथा पत्रकारिता, शिक्षण क्षेत्रातील विविध मान्यवरानी त्यांना शाल,श्रीफळ,पुष्पगुछ, केक कापून शुभेच्छा देण्यात आल्या . यावेळी प्राचार्य केशवे यांचा वाढदिवस असल्याच्या निमित्याने उत्सहात साध्या पद्धतीने साजरा करण्यात आला. यावेळी शंकरराव चव्हाण महाविद्यालय आष्टा, ग्यानबाजी केशवे विद्यालय माहूर दत्तगुरु प्राथमिक शाळा माहूर चे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसह अनेक स्नेहीगण मंडळींनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

# आठ वर्षीय शेख बिलालचा आयुष्यातील पहिला रोजा



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**शिराढोण । दौलत पांडागळे**

इस्लाम धर्मातील पवित्र मानल्या जाणाऱ्या रमजान महिन्याला दोन मार्च पासून सुरूवात झाली असून शिराढोण येथील शेख बिलाल सलाऊदिन या आठ वर्षीय चिमुकल्याने आपल्या आयुष्यातील पहिला रोजा पुर्ण केला.रमजान महिन्यात महीला पुरुष यांच्या सह लहान चिमुकले सुद्धा रोजा(उपवास) ठेवतात यावर्षी दोन मार्च पासून रमजान महिन्याला सुरूवात झाली आहे. उन्हाची तीव्रता वाढत आहे तरीपण या वाढत्या उन्हामुळे अंगाची लाही लाही होत असताना शेख बिलाल या चिमुकल्याने पहीला रोजा पुर्ण केला चौदा तास अन्न पाण्याचा त्याग करून रोजा (उपवास) पुर्ण केला जातो व पुर्ण महीना तरावीह मध्ये कुरान पठन केली जाते त्यामध्ये चिमुकले सुद्धा सहभागी होतात.शेख बिलाल याचा पहीला रोजा (उपवास) असल्याने इफ्तार पुर्वी नविन कपडे फुलांचा हार व मिठाई भरवून शुभेच्छा देऊन कौतुक केले आहे.

# काल्याच्या कीर्तनाने संगमवाडीतील अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

अखंड हरिनाम सप्ताह हा वारकरी सांप्रदायिक धार्मिक सामूहिक आराधना करण्याचा वारकरी भक्तिमार्गात एक प्रकार आहे.वारकरी संप्रदायामध्ये अखंड हरिनाम सप्ताहाला मोठे महत्त्व आहे.संगमवाडी येथील ग्रामदैवत असलेल्या हनुमान व विठ्ठल-रुख्मिणी मंदिर परिसरात अखंड हरिनाम सप्ताह दि.४ मार्च ते ११ मार्चदरम्यान सप्ताह साजरा झाला,विशेष म्हणजे या सप्ताहास ४६ वर्षांची अखंड परंपरा आहे.

अखंड हरिनाम सप्ताह संगमवाडी येथे ४ मार्चला किर्तनकार ह.भ.प.श्री भागवत महाराज महाळंगीकर ५ मार्च ह.भ.प.श्री बंडा महाराज आलगरवाडीकर, ६ मार्च ह.भ.प.श्री पंढरीनाथ म. नांदेडकर , ७ मार्च ह.भ.प.श्री सतीश म. पंढरपुरकर,८ मार्च ह.भ.प.श्री काशिनाथ म. नगरवाडीकर, ९ मार्चला ह.भ.प.श्री प्रसाद म. गडदे आळंदीकर,१० मार्च ह.भ.प.श्री ज्ञानेश्वर म. पवार पंढरपुरकर व ११ मार्चला काल्याचे कीर्तन ह.भ.प.श्री प्रभाकर म.झोलकर (नाना) यांचे झाले, यांच्या रसाळ वाणीतून भाविक भक्त मंत्रमुग्ध झाले.सप्ताह काळात वेगवेगळ्या विषयांवर विविध नामवंत कीर्तनकारांकडून समाज प्रबोधनाचे कार्य करण्यात आले. व कीर्तनातून आईवडिलांचा सांभाळ करावा,असे आवाहन केले.आईवडिलांची सेवा हाच खरा धर्म असल्याचे त्यांनी सांगितले.



भगवान श्रीकृष्णाने अवतार घेतल्यापासून बालपणी केलेल्या कृष्ण लीलांचे वर्णन त्याचप्रमाणे अवतार संपेपर्यंत जीवनप्रवासावर प्रबोधन केले.दहीहंडीच्या कार्यक्रमांच्या काल्याने सप्ताहाची सांगता झाली .भागवताचार्य श्री.ह.भ.प. माधव महाराज केंद्रे माळाकोळीकर यांच्या रसाळ वाणीतून भागवत कथेत श्रीकृष्णाच्या विविध लीलांचे वर्णन करण्यात आले आहे,त्यांना संगितसाथ -संगित विशारद गोपीनाथ गुरुजी केंद्रे,सिंध वादक - वासुदेव महाराज महाळंगीकर,मृदंग सेवक सत्यम महाराज केंद्रे यांची सोबत होती . अखंड हरिनाम सप्ताहात संगमवाडीचा परिसर भक्तिमय परिस्थितीने दुमदुमून गेला.सप्ताहानिमित्त मंदिरात आकर्षक सजावट व विद्युत रोषणाई करण्यात आली होती. पंचक्रोशीतील हजारो भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.काल्याचे कीर्तन झाल्या नंतर महाप्रसादाचा आस्वाद भाविक भक्तांनी घेतला,

# जि.प.प्रा.शा.मंगनाळी शाळेस चौवीस हजाराचे सांस्कृतिक कार्यक्रमात बक्षीस



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आंबुलगा । सुर्यभान बिजलगावे**

जि. प. प्रा. शाळा मंगनाळी येथे शाळेतील पहीली ते आठवी वर्गातील विद्यार्थी, विद्यार्थीनींनी सांस्कृतीक कार्यक्रम सादर करून शाळेसाठी २४०००/-रुपयाचे बक्षीस पटकावले आहे. सदर कार्यक्रमास गावातील नागरीक पालक हजारोंच्या संख्येने उपस्थीत होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सांस्कृतीक विभाग प्रमुख मुख्याध्यापक, शिक्षक, सरपंच, उपसरपंच, अध्यक्ष सर्व सदस्य शा.व्य.स. चेअरमन, पोलीस पाटील, विविध पदाधिकारी, पालक इत्यादींच्या सहकार्याने विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यात आला. उपस्थीतांचे आभार मुख्याध्यापक श्री कदम एस.व्ही.यांनी मानले आहेत.

# विकासकामे दर्जेदार करण्यासाठी ग्राम-स्थांनी सहकार्य करावे-रणवीर पंडित

## बोरगाव येथे ग्रामपंचायत इमारत बांधकामाचा भव्य शुभारंभ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई । ज्ञानेश्वर उदावंत**

लोकांनी मोठ्या विश्वासाने आपल्याला निवडून दिले आहे. विजय काका आमदार झाले आहेत, त्यामुळे आता रखडलेली विकासकामे गतीने पुर्ण होतील. होणारी कामे दर्जेदार केली जातील. आपल्या सहकार्याची गरज असून आपल्या गावात होणारी विकासकामे दर्जेदार करण्यासाठी सर्वांनी समन्वयांनी काम करण्याचे आवाहन शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांनी केले. बोरगाव येथे विविध विकास कामांचा शुभारंभ करताना ते बोलत होते.



गेवराई विधानसभा मतदारसंघातील मौजे बोरगाव नवे, बोरगाव जुने व बरड येथे नुतन ग्रामपंचायत इमारत बांधकामाचा शुभारंभ मंगळवार दिनांक ११ मार्च रोजी शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक नंदकिशोर गोर्डे, विश्वांभर गोरडे, सुभाष गोर्डे, सरपंच एकनाथ बनसोडे, अशोकराव जाधव, अनिल जाधव, भाऊसाहेब खंदारे, शंकरराव जाधव, परमेश्वर जाधव, अशोक पाटील, वैजनाथ जाधव, विनायक जाधव, बाळु आवारे, तुकाराम जाधव, रमेश जाधव, रविंद्र जाधव, बाळु जाधव, कल्याण नलावडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक राहुल जाधव यांनी केले. सूत्रसंचालन शिवराज जाधव यांनी केले तर आभार ग्रामपंचायत सदस्य तुकाराम जाधव यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सरपंच एकनाथ बनसोडे, उपसरपंच राहुल जाधव, ग्रामपंचायत सदस्य अशोक जाधव, संदीप जाधव, तुकाराम जाधव, ब्रह्मनाथ जाधव, बाळू जाधव यांनी परिश्रम घेतले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सिद्धबेट केळगाव परिसरात स्वच्छता अभियान उत्साहात

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आळंदी देवाची । इम्रान हकीम**

संत लीलाभूमीत वृक्ष संवर्धनास प्राधान्यआळंदी :अजिंक्य डी वाय पाटील स्कूल ऑफ इंजिनिअरिंग पॉलिटेक्निक चऱ्होली बुद्रुक राष्ट्रीय सेवा योजना तर्फे सिद्धबेट केळगाव परिसरात स्वच्छता अभियान उत्साहात राबविण्यात आले. यावेळी सिद्धबेट संत लीलाभूमीत वृक्ष संवर्धन, पर्यावरण संवर्धनात वृक्ष संगोपनात वृक्षांना पाणी देण्यासह स्वच्छता करीत घंटागाडीत संकलित करण्यात आलेला प्लास्टिकसह कचरा केळगाव ग्रामपंचायती कडे पुढील व्हिलर लावण्यास सुपूर्द करण्यात आला.

या स्वच्छता मोहिमेत पॉलिटेक्निकच्या प्रथम वर्ष विभागातील विद्यार्थ्यांनी इंद्रायणी घाट परिसर स्वच्छता, सिद्धबेट परिसर वृक्ष संवर्धन आदी उपक्रम राबविण्यात आले. यावेळी अजिंक्य डी वाय पाटील पॉलिटेक्निकच्या प्रथम वर्ष विद्यार्थ्यां तर्फे आळंदी शहरातून प्रभात फेरी काढत वृक्ष संवर्धनाचे महत्त्व पटवून देण्यात आले. या प्रसंगी आळंदी जनहित फाऊंडेशन कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर, शशिकांत राजेजाधव, पसायदान गुरुकुलचे अध्यक्ष योगेश महाराज वाघ, रोहिदास कदम, तुषार नेटके, कैवल्य टोपे,नीलेश गायकवाड, केळगाव ग्रामपंचायत कर्मचारी वृंद यांनी प्रत्येक्ष सहभागी होत उपक्रमास मार्गदर्शन केले. आळंदी जनहित फाउंडेशन कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर, अजिंक्य डी वाय पाटील पॉलिटेक्निक महाविद्यालयाचे समन्वयक डॉ नागेश



शेळके यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. अजिंक्य डी वाय पाटील महाविद्यालयाच्या कार्यकारी उपाध्यक्ष डॉ कमलजीत कौर, प्राचार्य डॉ फारुक सय्यद, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक दिलीप घुले यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा भूषण बिरारी, प्रा रोहिणी हुलसुरे, प्रा स्वाती गांडगे, दीपक जेजुरकर व पॉलिटेक्निकच्या प्रथम वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांनी कार्यक्रम यशस्वीते साठी परिश्रम घेतले. सिध्दबेटातील स्वच्छता अभियान झाल्या नंतर श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरात श्रींचे संजीवन समाधी दर्शन, मंदिर प्रदक्षिणा करत उपक्रमाची सांगता करण्यात आली.आळंदी देवस्थान चे वतीने उपव्यवस्थापक तुकाराम माने यांचे हस्ते सामाजिक बांधिलकीतून उपक्रम राबविल्या बद्दल आळंदी देवस्थान तर्फे महाविद्यालयाचा सत्कार करण्यात आला. पॉलिटेक्निक विभागातर्फे नाविन्यपूर्वक व समाजपयोगी तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रम आयोजित केल्या बद्दल संस्थेच्या कार्यकारी उपाध्यक्ष डॉ कमलजीत कौर यांनी विद्यार्थ्यांचे व संयोजकांसह शिक्षकांचे विशेष कौतुक केले. आळंदी देवस्थान चे वतीने उपव्यवस्थापक तुकाराम माने यांचे हस्ते उपस्थित टीमचा सत्कार करण्यात आला. यावेळी कॉलेज तर्फे आळंदी देवस्थानचा देखील सत्कार करण्यात आला.

# वडमुखवाडीत श्रीविठ्ठल रुख्मिणी मूर्ती प्राणप्रतिष्ठापना वर्धापन दिन उत्साहात

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आळंदी देवाची । इम्रान हकीम**



येथील वडमुखवाडी मधील श्री विठ्ठल रुख्मिणी मंदिरातील श्री विठ्ठल रुख्मिणी, श्री राम , लक्ष्मण, सीता, श्री राधाकृष्ण व श्री हनुमान मूर्ती प्राणप्रतिष्ठापना तिसरा वर्धापन दिन आणि श्री संत तुकाराम महाराज सदेह वैकुंठ गमन ३७५ वा बीज सोहळा, एकादशी निमित्त प्रथा परंपरांचे पालन करीत विविध धार्मिक कार्यक्रम हरिनाम गजरात ग्रामस्थांचे वतीने उत्साहात झाले.

विविध धार्मिक कार्यक्रमात पहाटे श्रीना अभिषेख पूजा, काकडा आरती झाली. सकाळी दहा ते दुपारी बारा या वेळात प्रसिद्ध कीर्तनकार ह. भ. प.उमेश महाराज दशरथे यांचे सुश्राव्य कीर्तन झाले. यावेळी ते म्हणले, आपल्या संस्कृतीत श्रींचे मूर्तीची प्राण प्रतिष्ठापना सजीव मानले जाते. तिचा उत्सव परंपरेने होणे गरजेचे आहे. आता पर्यंत ग्रामस्थांनी हि परंपरा चालवली आहे. या पुढे हि चालू राहावी अशी भावना कीर्तनकार दशरथे यांनी व्यक्त केली. वर्धापन दिना निमित्त श्रींचे मंदीरावर लक्षवेधी विद्युत रोषणाई आणि आकर्षक पुष्प सजावट करण्यात आली होतो. भाविकांनी श्रींचे दर्शनास गर्दी करीत दर्शन घेतले.

या प्रसंगी कीर्तनास श्री पद्मावती ट्रस्टचे अध्यक्ष पंडित महाराज तापकीर, गणेश महाराज तापकीर, भजनी मंडळ अध्यक्ष भानुदास महाराज तापकीर, थोरल्या पादुका देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ड विष्णू तापकीर, सचिन महाराज गिलबिले, वसंत महाराज तापकीर लोकल बोर्ड संचालक शांताराम तापकीर, चेअरमन सुरेश तापकीर आदी मान्यवर व भाविक उपस्थित होते. भाविकांना फराळ महाप्रसाद वाटप करण्यात आले.

# मानवी जीवन अत्तराने नाही तर संस्काराने सुगंधीत बनते-स्वामी गजेंद्र चैतन्यजी महाराज

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकर । रमाकांत जोशी**

मानवी जीवन अत्तराने नाही तर सुसंस्काराने सुगंधित बनते आणि सुसंस्कार हे संतांच्या सानिध्यातून मिळतात म्हणून नेहमी माणसांनी साधू संतांची संगती करावी असे विचार परमपूज्य स्वामी गजेंद्र चैतन्यजी महाराज यांनी मौजे हाळदा येथील संत तुकाराम महाराज बीज महोत्सवानिमित्त आयोजित श्रीमद् देवी भागवत महापुराण कथेतून बोलताना व्यक्त केले. कथेतील दुसऱ्या दिवशी उपस्थित श्रोते मंडळींना मार्गदर्शन करते वेळेस त्यांनी अत्यंत मोलाचे विचार सांगितले.



पुढे बोलताना त्यांनी सांगितले की माणसाच्या जीवनात संस्कार अत्यंत महत्त्वाचे आहेत संस्कार नसतील तर माणूस पशु समान जीवन जगतो.म्हणून आई-वडिलांनी लहानपणापासूनच आपल्या मुलाबाळावर चांगले संस्कार करावेत.तसेच त्यांना शूरवीरांच्या महापुरुषांच्या कथा सांगून त्यांची मने सुद्रुढ बनवावीत.गावातील आयोजित सप्ताहातून श्रीमद् भागवत कथा,शिव कथा, राम कथा,श्रीमद् देवी भागवत कथा महापुराण व अनेक ग्रंथाचे पारायण हे मानवी मनाला सुसंस्कारित करण्यासाठीच सांगितल्या जातात तेव्हा सर्वांनी य ज्ञान अमृतात न्हाऊन निघून आपले जीवन सुसंस्कारी बनवावे असे सांगितले. भगवंतांनी आपणाला हा अत्यंत पवित्र मानवी देह दिला आहे तेव्हा त्याला विविध व्यसनाच्या आहारी जाऊ न देता स्वच्छ ठेवावे. गळ्यात तुळशीची माळ धारण करावी, प्रभुचे चिंतन करीत जावे, युक्त आहार विहार ठेवावा. तसेच लवकर झोपावे लवकर उठावे सर्व गोष्टी मर्यादित ठेवाव्यात असे सांगितले. युक्त आहार विहारस्य युक्त चेष्टसे कर्मसु हा गीतेचा सिद्धांत पटवून सांगितला. लवकर झोपे लवकर उठे,तया ज्ञान संपत्ती आरोग्य भेटे हा सिद्धांत ही विविध दृष्टांत देऊन पटवून सांगितला व जीवनात राग आणि द्वेष बाजूला सारून विवेकाने जीवन जगावे हाच खरा या श्रीमद् देवी भागवत महापुराण कथेचा संदेश आहे असे सांगितले. त्यांच्या रसाळ वाणीतून होत असलेल्या अर्थपूर्ण कथेचा लाभ गावातील व परिसरातील शेकडो भाविक भक्त व माता-भगिनी मोठ्या संख्येने घेत आहेत.

# कासार सीरशी येथे जागतिक महिला दिना निमित्त एकल महिला सक्षमीकरण मेळावा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कासार शिरसी । फिरोज जागीरदार**



जागतिक महिला दिनानिमित्त नानी माँ बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व साऊ एकल महिला पुनर्वसन समिती निलंगा तालुका समन्वयक फिरोज जागीरदार यांच्या अध्यक्षतेखाली महिला सक्षमीकरण मेळावा घेण्यात आला या सक्षमीकरण मेळाव्याला प्रमुख पाहुणे म्हणून कल्पना डविले मॅडम बचत गट समन्वयक रावते सर येथील मुख्याध्यापिका होळकुंदे मॅडम अलका मुळे शीतल बिराजदार यांची प्रमुख उपस्थिती होती या मेळाव्याला एकल महिला पुनर्वसन समितीचे समन्वयक फिरोजागीदार यांनी मार्गदर्शन करताना येथील महिला आणि शासकीय योजना व बालसंगोपन योजना संजय गांधी निरादार योजना कृषी योजना बचत गट योजना जिल्हा उद्योग केंद्र योजना या शासकीय योजनांचा लाभ घेऊन महिला छोटे-मोठे उद्योग व्यवसाय उभे करण्यासाठी महिलांनी प्रयत्न केले पाहिजेत साऊ एकल महिला पुंर्वसन समिती कोरोना काळा पासून विविध एकल महिलाना योग्य ते सहकार्य मार्गदर्शन करण्याचे काम करत आहोत एकल महिला भगिनींना शासकीय योजनाची खरी गरज आहे आणि साऊ एकल महिला समितीच्या वतीने येणाऱ्या काळामध्ये वेगवेगळे कौशल्य प्रशिक्षण आणि लघु उद्योग प्रशिक्षण देऊन महिलांना सक्षम करण्यासाठी शासकीय स्तरावर प्रयत्न करणार आहोत या मेळाव्याला यावेळी उपस्थित रावते सर यांनी महिला बचत गट आणि महिला महिला उद्योग प्रशिक्षण याविषयी मार्गदर्शन केले व उपस्थित कल्पना ढविले मॅडम यांनी एकल महिलांचे गट बांधणी करून महिलांना सक्षम करण्याविषयीचे चर्चा केले या मेळाव्याला यशस्वी करण्यासाठी परिसरातील अशा बिराजदार शीतल बिराजदार व अनेक महिलांनी सहभाग घेतला.

# आर्या नैसर्गिक शेतीची कृषी विज्ञान केंद्र तोंडापूर हिंगोली यांच्याकडून पाहणी




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । गोविंद मोरे**

आर्या नैसर्गिक शेतीची कृषी विज्ञान केंद्र तोंडापूर जिल्हा हिंगोली यांच्याकडून पीक पाहणी करण्यात आली .या दरम्यान सर्व पिकाची पाहणी करून सर्व पिका ची कार्यपद्धती जाणून घेतली .आर्या नैसर्गिक शेतीमध्ये उभे असलेले मॉडेल हे अत्यंत सुंदर मॉडल आहे ,गुजरातला आम्ही गेलो होतो तिथे पण अशी मॉडेल नाही असे त्यांनी यादरम्यान सांगितले. आर्या नैसर्गिक शेतीमधील नियोजन हे उत्कृष्ट पद्धतीचे आहे .यावेळी उपस्थित रोहिणी भगवान शिंदे ,साईनाथ खरात कृषी विज्ञान केंद्र तोंडापूर , हिंगोली येथील अनेक अधिकारी, हिंगोली येथील शेतकरी नकुल , एडवोकेट उदय संगारेड्डीकर उपस्थित होते. विश्वनाथ गोविंदराव पाटील होळगे रा.दापशेड ता. लोहा जि. नांदेड. मो. नं. ९७६४०२५२०९

# निवडणूक कर्तव्यावर मयत बि.एल.ओ. यांच्या वारसांना सानुग्रह अनुदान वाटप



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । प्रतिनिधी**

विधानसभा सार्वत्रिक व लोकसभा पोट निवडणूक २०२४ च्या पुर्व तयारीच्या अनुषंगाने ९० देगलूर विधानसभा मतदारसंघातील सर्व बि. एल. ओ. यांची बैठक दिनांक १७/१०/२०२४ रोजी बोलविण्यांत आलेली होती. सदरील बैठक आटोपुन परत जात असताना कुन्मारपली मतदार केंद्र क्रमांक ३५० चे बि. एल. ओ. योगेश शेषेराव पाटिल यांचा अपघाती मृत्यु झाला होता. निवडणूक कर्तव्यावर असताना कर्मचारी मयत झाल्यास मा. भारत निवडणूक आयोगाकडुन १५ लक्ष इतके सानुग्रह अनुदान देय आहे. त्यानुषंगाने मयत बि. एल. ओ. यांचा सानुग्रह अनुदानाचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी नांदेड यांच्या मार्फत शासनाकडे सादर करण्यात आलेला होता.तत्कालिन जिल्हाधिकारी मा. अभिजित राउत उपजिल्हाधिकारी निवडणूक राजकुमार माने, ९० देगलूर विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती क्रांती डोंबे सहा. निवडणूक निर्णय अधिकारी भरत सुर्यवंशी सहा. महसुल अधिकारी फयाज शेख, सहा. महसुल अधिकारी सचिन कोणेरी, महसुल सहायक . गिरीष भुसेवार, निवडणूक ऑपरेटर संदिप कांबळे इत्यादीनी सदर अनुदानासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले.शासनाकडे सादर केलेला प्रस्ताव दिनांक १७/०२/२०२५ रोजी मंजुर केले आहे. दिनांक १०/०३/२०२५ रोजी सहा. जिल्हाधिकारी मा. अनुष्का शर्मा मॅडम यांच्या हस्ते संबधित कर्मचारी यांचे वारस पत्नी प्रणिता योगेश बिरादार यांना १५ लक्ष रुपयाचा धनादेश देण्यात आला.संबधित वारसांना लाभ मिळुन देण्यामध्ये गटशिक्षणाधिकारी तोटरे तोटावाड , शंकर जंपलवाड अरुणकुमार शिंदे इत्यादीनी पाठपुरावा केला होता.

# होळीनिमित्त सतत २५ व्या वर्षी होणा-या महा मुर्ख कविसंमेलनाची नांदेड येथे जय्यत तयारी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । गौतम बनसोडे**

दि.१३ मार्च २०२५ गुरूवार रोजी सायंकाळी ६ ते १० वाजेपर्यंत मार्केट कमिटी मैदान,नवा मोंढा नांदेड येथे होणाऱ्या या अनोख्या कविसंमेलनात शृंगारिक कविता व द्विअर्थी विनोदाने देशातील नामवंत कवी नांदेडकरांना हास्यरंगात भिजवून टाकणार असल्याची माहिती संयोजक धर्मभूषण ड.दिलीप ठाकूर, डॉ. जुगल धूत,जेष्ठ पत्रकार पंढरीनाथ बोकारे यांनी दिली आहे

संपुर्ण देशभरात फक्त बनारस आणि नांदेड या दोन ठिकाणीच अश्या प्रकारचे कविसंमेलन आयोजित करण्यात येते.होलीका उत्सव समिती नांदेड,लायन्स क्लब नांदेड सेंट्रल द्वारा आयोजित महामूर्ख कविसंमेलनाचे उद्घाटन आ.आनंदराव बोन्ढारकर यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दिपकसिंह रावत तर विशेष अतिथी सतीश सुगनचंद शर्मा म्हणून उपस्थित राहणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून ड.किशोर देशमुख ,व्यंकटेश जिंदम,डॉ. उमेश भालेराव,डॉ. सुशील राठी,शिवप्रसाद राठी,नागेश शेट्टी,आनंद साताळे,सचिन




शिवलाड,सेवकसिंघ जहागीरदार, शिवाजीराव इबितवार,नवल पोकर्णा,संदीप अग्रवाल,राजेंद्र हुरणे,संजय बोधने, सुमेर राजपुरोहित हे राहणार आहेत.आगळ्यावेगळ्या या कवी संमेलनात अनिल आवारा बनारस,विनोद सोनी मुंबई,लक्ष्मीचंद ठाकूर बालाघाट यांना विशेष आमंत्रित करण्यात असून त्यांच्या अजब शैलीमुळे श्रोते लोटपोट होणार आहेत.याशिवाय गेल्या अनेक वर्षापासून नांदेडचे महामूर्ख कवी संमेलन गाजविणारे हास्यसम्राट सिध्दार्थ खिल्लारे व शाहीर रमेश गिरी,चला हवा येऊ दे फेम सतीश कासेवाड,प्रा.रविंद्र अंबेकर पुणे, गझलकार बापू दासरी पत्रकार राजेंद्र शर्मा,रेश्माजी हिंगोले,सिनेस्टार लच्छु देशमुख,बजरंग पारीख,वैजनाथ जाधव,वसंतराव हिंगोले यवतमाळ हे होळीचा आनंद द्विगुणित करणार आहेत.संयोजन समितीमध्ये सुरेश लोट,कामाजी सरोदे,राजेशसिंह ठाकूर ,सुरेश शर्मा ,अरुण काबरा ,सुरेश निलावार, शिवाजीराव पाटील यांचा समावेश आहे.दमराठवाड्यासह विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, तेलंगाना मधील रसिक या कविसंमेलनाला आवर्जून उपस्थित असतात.कार्यक्रमाचे स्थळ बदलले असल्यामुळे नवीन स्थळाची माहिती आपल्या सर्व मित्रांना देण्यात यावी. कार्यक्रम निशुल्क असला तरी १६ वर्षावरील पुरुषांनाच प्रवेश मिळणार आहे. जागा मर्यादित असल्यामुळे रसिकांनी वेळेवर उपस्थित रहावे असे आवाहन संयोजक ड.दिलीप ठाकूर,डॉ. जुगल धूत,पंढरीनाथ बोकारे यांनी केले आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904